# पुणे महानगरपालिका
# स्थायी समिती
# कार्यपत्रिका क्र. २९
# सभा क्र.३६, दिनांक १६/१०/२०२५ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा गुरूवार, दि. १६/१०/२०२५ रोजी दुपारी ४.०० (चार) वाजता मा. महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| मा. नवल किशोर राम | – | प्रशासक तथा महापालिका आयुक्त |
| मा. ओमप्रकाश दिवटे | – | अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) |
| मा. एम.जे.प्रदीप चंद्रन | – | अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई) |
| मा. पृथ्वीराज बी.पी. | – | अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) |
| मा. सौ.योगिता भोसले–निकम | – | नगरसचिव |
| मा. उल्का कळसकर | – | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| मा. ॲड.निशा चव्हाण | – | मुख्य विधी अधिकिरी |
| मा. नितीन केंजळे | – | मुख्य कामगार अधिकारी |
| मा. प्रसाद काटकर | – | उपायुक्त (परिमंडळ–३,निवडणूक,ओएसडी ) |
| मा. विजयकुमार थोरात | – | उपायुक्त (सामान्य प्रशासन, तांत्रिक, बीओटी सेल) |
| मा. संदीप कदम | – | उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) |
| मा. वसुंधरा बारवे | – | उपायुक्त (प्राथमिक, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण, प्रशिक्षण प्रबोधिनी) |
| मा. अविनाश सकपाळ | – | उपायुक्त (कर आकारणी व कर संकलन विभाग) |
| मा. प्रशांत ठोंबरे | – | उपायुक्त (मालमत्ता व व्यवस्थापन, दक्षता) |
| मा. संतोष वारुळे | – | उपायुक्त (परिमंडळ–२, माहिती जनसंपर्क, सोशल मिडिया) |
| मा. संदिप खलाटे | – | उपायुक्त (अतिक्रमण, सुरक्षा) |
| मा. अरविंद माळी | – | उपायुक्त (मध्यवर्ती भांडार, परिमंडळ–४) |
| मा. अनिरुद्ध पावसकर | – | मुख्य अभियंता (पथ) |
| मा. मनिषा शेकटकर | – | मुख्य अभियंता (विद्युत) |
| मा. नंदकुमार जगताप | – | मुख्य अभियंता (पाणी पुरवठा) |
| मा. रामदास तारु | – | अधिक्षक अभियंता |
| मा. सुनंदा वाखारे | – | प्रशासन अधिकारी–शिक्षण विभाग |
| मा. डॉ. संजीव वावरे | – | सहाय्यक आरोग्य अधिकारी |
| मा. राहूल जगताप | – | ई–प्रशासक (माहिती तंत्रज्ञान विभाग) |

**मा. प्रशासक –** सभेला सुरूवात करावी.

**नगरसचिव –** सभेला सुरुवात करण्यात येत आहे.

**<u>वृत्तांत कायम करणे.</u>**

स्थायी समिती सभा क्र.३४, दि.०३/१०/२०२५ व सभा क्र.३५, दि.१०/१०/२०२५ असे ०२ सभा वृत्तांत कायम करण्यात आले.

**<u>दाखल विषय</u>**

**विषय क्र.७६३त्वर्य**

पुणे शिवाजीनगर फा. प्लॉ.नं. ६६०, जंगली महाराज रस्ता येथील वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे कामी निविदा मागविली असता आलेल्या ६ निविदांपैकी निविदाधारक मे.इंडिया एन्टरप्रायझेस यांनी देऊ केलेली वार्षिक र.रु.२८,००,०७५=६० (अक्षरी अठ्ठावीस लक्ष पंच्याहत्तर रुपये साठ पैसे फक्त) हि मनपा निर्धारित र.रु.१८,४२,१५५/- पेक्षा र.रु.९,५७,९२०/- म्हणजेच ५२% ने जास्त असल्याने सदर निविदा स्वीकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्तीप्रमाणे प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर २% आयकर घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/७७५, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७६४त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील विविध प्रकारच्या वाहनांना लागणारे विविध साईजचे टायर सेट खरेदी करणे कामी बी -२ पद्धतीने निविदा मागविली असता आलेल्या २ निविदांपैकी निविदाधारक मे. व्होरा ऑटो सर्विसेस, पुणे यांचेकडून र.रु.५०००००/- व मे.इस्टर्न टायर्स, पुणे यांचेकडून र.रु.४५०००००/- पर्यंत जीएसटीसह या रक्कमेपर्यंत जस जसे लागतील तस तसे आवश्यकतेनुसार खरेदी करणे व त्या कामी त्यांचे बरोबर टेंडर अटी शर्तीनुसार करारनामा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मोटारवाहन/७७८, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७६५त्वर्य**

वडगाव जलकेंद्र येथे समान पाणीवाटप योजनेअंतर्गत बसविण्यात येणाऱ्या पंपामुळे वाढीव लोडसाठी वीजपुरवठा करणे व पर्यायी सप्लाय उपलब्ध होणे कामी नांदेड सबस्टेशन ते वडगाव जलकेंद्र पर्यंत केबल टाकणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. NEW SOLAR ELECTRICALS AND ELECTRONICS यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४,८७,७८,२५८/- पेक्षा १७.७१% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४,०१,३९,६२८=५१ अधिक जीएसटी र.रु.७२,२५,१३३/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४,७३,६४,७६१=५१ (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी त्र्याहत्तर लक्ष चौसष्ट हजार सातशे एकसष्ट रुपये एक्कावन्न पैसे फक्त) तसेच वर्क ऑर्डर दिनांकापासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.४७५०००००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/७७९, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७६६त्वर्य**

लष्कर जलकेंद्र अंतर्गत रामटेकडी पंप क्र.४ येथील व्ही.टी. पंपाचे कोरोकोटिंग, दुरुस्ती व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Ranka Engnieers यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३७,७६,०३२/- पेक्षा ०.१६०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७,६९,९९०=३५ अधिक जीएसटी र.रु.६,७८,५९८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४४,४८,५८८=३५ तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.२३,००,०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/७८०, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७६७त्वर्य**

अलका चौकातील छत्रपती संभाजी महाराज पूल (लकडी पूल) येथे मोठ्या व्यासाच्या जलवाहिनीचे स्थलांतरण करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Nabilal Construction यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५९,२१,६३७/- पेक्षा १.८००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५८,१५,०४७=५३ अधिक जीएसटी र.रु.१०,४६,७०९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.६,९१७=७६ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- अधिक सल्लागार शुल्क र.रु.३,७००/- पर्यंत अशी एकूण र.रु.६८,७२,३७४=५३ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (२२-१०-२०२४) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.७०,००,०००) पर्यंत तसेच काम करणेस तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/७८२, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७६८त्वर्य**

लष्कर जलकेंद्र अंतर्गत साडेसतरानळी येथे बुस्टर पंप बसविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. AADESH ELECTRICALS AND CONTRACTORS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३७,८६,६३३/- पेक्षा २.१००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७,०७,११३=७१ अधिक जीएसटी र.रु.६,६७,२८०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४३,७४,३९३=७१ तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.३७,५०,०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/७८४, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७६९त्वर्य**

लष्कर जलकेंद्र अंतर्गत उंड्री येथे बुस्टर पंप बसविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. AADESH ELECTRICAL AND CONTRACTORS यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४९,७५,९६७/- पेक्षा २.४००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,१५,७१४=९ अधिक जीएसटी र.रु.७,४०,८२९/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४८,५६,५४३=९ तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.३०,००,०००)

पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/७८६, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७७०त्वर्य**

कोथरूड बावधन क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत हद्दीतील व नव्याने समाविष्ट गावातील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आउटसोर्सिंग पद्धतीने करणे या कामासाठी र.रु. अंदाजे २,८०,००,०००/- सन २०२५-२६ अंदाजपत्रकातील बजेटकोड RE19A204D हेडवर चार महिन्याकरिता मे. सुमित फैसिलिटी प्रा.लि. यांचेकडून दि.०१/०७/२०२५ ते ३०/१०/२०२५ पर्यंत त्यांचे निविदा दरानुसार (ॲटपर दराने) काम करून घेणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अन्वये नवीन निविदा प्रक्रियेतील ठेकेदारास वर्क ऑर्डर देण्याच्या दिनांक पर्यंत काम करुन घेणेस तसेच कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनाच्या वेळोवेळी होणारी वेतन वाढ आदा करणेस व त्याच्यांशी करारनामा करणेस त्यादिवसापासून ठेकेदार मे. सुमित फैसिलिटी प्रा.लि. यांना बिल आदा करणेस मा. स्थायी समिती यांचे मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/परि.क्र.२/७८७, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७७१त्वर्य**

स्थानिक निधी लेखापरीक्षण संचनालय, पुणे महानगरपालिका लेखापरीक्षण शाखेमार्फत सन २०१८-२०१९ ते २०२० -२०२१ या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षण अहवाल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०७ – अ अन्वये अवलोकनार्थ ठेवणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुलेवि/७८८, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७७२त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या येरवडा हॉट मिक्स प्लांटकरिता डांबरी (व्ही.जी. 30/40 बेड), एल. डी ओ. इमल्शन आर. एस.-1, आर. एस.-II महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण ५ मधील कलम 2 (2) अन्वये र रु १२ कोटी इतक्या रककमेची डांबर खरेदी करणेबाबत खालील बाबींस मा स्थायी समिति मार्फत मा मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणे मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/७८९, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण ५ मधील कलम 2 (2) अन्वये डांबर, एल.डी.ओ. हि दोन्ही मटेरियल्स मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पो.ली. आणि मे. भारत पेट्रोलियम कॉर्पो. ली. यांचे कडून आवश्यकतेनुसार मुंबई येथील रिफायनरी मधून खरेदी पुढील निविदा मान्यते पर्यन्त करणेस व सदरचा डांबरी माल रिफायनरी ते येरवडा हॉट मिक्स प्लांट पर्यन्त पुणे महानगर पालिकेच्या पथ विभागाच्या निविदेमधून वाहतूक करणेस.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण ५ मधील कलम 2 (2) अन्वये Emulsion RS-I व Emulsion RS-II, हे मटेरियल्स में हिंदुस्थान कोलास कंपनी या कंपण्याकडून आवश्यकतेनुसार खरेदी करणेस व सदरचा डांबरी माल रिफायनरी ते येरवडा हॉट मिक्स प्लांट पर्यन्त पुणे महानगर पालिकेच्या पथ विभागाच्या निविदेमधून वाहतूक करणेस.

३) वरील मटेरियल्स खरेदी पोटी मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पो. ली. में. भारत पेट्रोलियम कॉर्पो.ली व में हिंदुस्थान कोलास प्रा.ली. या तिन्ही कंपन्यांना वेळोवेळी आवश्यकतेनुसार अग्रिम (advance) रक्कम (रुपये १२ कोटी पर्यन्त) चेक आर. टी. जी एस स्वरूपात, सन 2025-26 अंदाजपत्रकातील बजेट कोड क्र. SE15A106 (विशेष कार्याधिकारी पथ) या अर्थशीर्षकामधून अदा करणेस.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७७३त्वर्य**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील (PMPML) सेवकांना सातवा वेतन आयोग फरकापोटी चार हप्तांमध्ये आदा करण्यात येणाऱ्या रकमेपैकी PMPML संस्थेस सेवकांना द्वितीय हप्ता आदा करणेकरिता पुणे महानगरपालिकेच्या स्वामित्वानुसार (६०%) र. रु. ८४.१५ कोटी (अक्षरीर. रु. चौऱ्याऐंशी कोटी पंधरा लक्ष) सन २०२५-२६ चे अंदाजपत्रकात "pmpml सेवकांना सातवा वेतन आयोग फरकापोटी (RE58A101E)" या अर्थशिर्षकांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीमधून आदा करणेस, मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुलेवि/७९०, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७७४त्वर्य**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात वितरीत करण्यात आलेल्या मोफत/सवलतीचे विविध बसपास प्रतीपुर्तीची रक्कम महामंडळास आदा करणेसाठी खालील बाबींस बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुलेवि/७९१, दि.१५/१०/२०२५ चे पत्र.

१) PMPML संस्थेने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात वितरीत केलेल्या मोफत / सवलतीचे विविध बसपास पोटी तपासणी अंती प्राप्त शिफारशी नुसार देय ठरणारी रक्कम रु.२०,००,६४,३२०/- (अक्षरी वीस कोटी चौसष्ट हजार तीनशे वीस रुपये) इतकी रक्कम PMPML संस्थेम पुणे महानगरपालिकेच्या सन २०२५ २६ चे अंदाजपत्रकात (RE58A101B) ४८ - क PMPML च्या विविध प्रकारच्या पासेसपोटी द्यावयाची रक्कम" या अर्थशीर्षकांतर्गत करण्यात आलेल्या तरतूदीमधून आदा करणेस,

२) उर्वरित सामान्य प्रशासन विभागाकडील प्रलंबित PMPML संस्थेकडून मागणी करण्यात आलेली रक्कम रु.४९,७०,०००/-पैकी तपासणी अंती सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त शिफारशी नुसार देय ठरणारी रक्कम PMPML संस्थेस पुणे महानगरपालिकेच्या सन २०२५-२६ चे अंदाजपत्रकात (RE58A101B) "४८ क PMPML च्या विविध प्रकारच्या पासेसपोटी द्यावयाची रक्कम" या अर्थशीर्षकांतर्गत करण्यात आलेल्या तरतूदीमधून आदा करणेस,

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७७५त्वर्य**

प्र.क्र. २६ मधील एन.आ.बी.एम रोड ते ऑर्चीड पॅलेस येथील २४ मी. रुंदीचा डी.पी. रस्ता विकसित करणे या कामासाठी प्री व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी व प्रत्यक्ष कामावर सुपरव्हिजनसाठी मे. Stuctsource Engineering Solutions यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/७९२, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

१) प्र.क्र. २६ मधील एन.आ.बी.एम रोड ते ऑर्चीड पॅलेस येथील २४ मी. रुंदीचा डी.पी. रस्ता विकसित करणे या कामासाठी प्री व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी व प्रत्यक्ष कामावर सुपरव्हिजनसाठी मे. Stuctsource Engineering Solutions यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस.

२) मे. Stuctsource Engineering Solutions यांनी सादर केलेल्या दरानुसार प्री टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी प्रकल्प 0.16% (शुन्य पॉइन्ट सोळा टक्के) व पोस्ट टेंडरसाठी 0.47% (शुन्य पॉइन्ट सत्तेचाळीस टक्के) असा एकूण 0.63% (शुन्य पॉइन्ट त्रेशष्ठ टक्के) याप्रमाणे त्यांना अदा करणेस व त्यांचे समवेत करारनामा करणेस.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७७६त्वर्य**

पथ विभागाकडील कोथरूड-बावधन क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.१०,११,१२ व नवीन समाविष्ट गाव बावधन बुद्रुक मधील कार्यक्षेत्रात पुणे मनपाच्या बॅच मिक्स प्लांट येथून मालाची वाहतूक करून रिसर्फेसिंगची कामे करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SADGURU CONSTRUCTION यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४२,३६,६४१/- पेक्षा ३३.४३% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,२०,३३१=९१ अधिक जीएसटी र.रु.५,०७,६६०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३३,२७,९९१=९१ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (२१-०७-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७९३, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७७७त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडे प्राप्त कोव्हीड CSR निधीमधून खालील तक्त्यामधील नमूद अनुक्रमांक १ ते ४ कामांसाठी र.रु.६,३१,२०,३३२/- (अक्षरी रक्कम रुपये सहा कोटी एकतीस लक्ष वीस हजार तीनशे बत्तीस फक्त) रकमेपर्यंत खर्च करणेस व निविदेप्रक्रीयेद्वारे खरेदी करणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/७९४, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | ऑटोअनालाझर खरेदी खरेदीकरिता | ५०,००,०००/- |
| २ | पुणे महानगरपालिकेच्या हॉस्पिटलकरिता वैद्यकीय साहित्य व तदअनुषंगिक साधनसामुग्री खरेदीकरिता | २,३१,२०,३३२/- |
| ३ | प्रसुतीगृहामध्ये व्हॅक्यूम असिस्टेड डिलिव्हरीकरिता साहित्य खरेदीकरिता | १,५०,००,०००/- |
| ४ | दवाखान्यांमध्ये लस साठवणुकीकरीता शितसाखळी उपकरणे, आय.एल.आर इत्यादी खरेदी | २,००,००,०००/- |
| | एकूण रक्कम रुपये | ६,३१,२०,३३२/- |

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७७८त्वर्य**

वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाचे विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी/मलनिःसारण वाहिनी/गॅसवाहिनी तसेच केबल खोदाईचे रिईनस्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे (भाग-३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. DATTATRAY NAMDEORAO BARGE यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.६७,७९,१२८/- पेक्षा ४२.४२% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,०३,४२१=९ अधिक जीएसटी र.रु.७,०२,६१६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४६,०६,०३७=९ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (१३-०६-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७९५, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७७९त्वर्य**

आळंदी रस्ता या मुख्य रस्त्यावरील रस्ते दुभाजक दुरुस्ती व पेंटिंग, पेडेस्ट्रीयन क्रॉसिंग, थर्मोप्लास्टिक पेंट, साईन बोर्ड, कर्ब स्टोन दुरुस्ती व पेंटिंग तसेच रस्ते देखभाल दुरुस्ती विषयक व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. B.N.CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५०,८४,४७०/- पेक्षा ४६.८९% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,००,३६२=०२ अधिक जीएसटी र.रु.४,८६,०६५/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३१,८६,४२७=०२ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (२९-०५-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/७९६, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७८०त्वर्य**

पुणे महानगरपालिका विविध कचरा प्रक्रिया प्रकल्पांचे देखभाल दुरुस्ती विषयक देयके अदा करणे कामी कमी पडणारी रक्कम खालीलप्रमाणे र.रु.१६.५०कोटी वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/८०८, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| **घनकचरा व्यवस्थापन विभाग**<br>१) गणपती उत्सवासाठी अमोनियम बायकार्बोनेट खरेदी करणे. RE19A159 | ०.०४५ | --- |
| २) गणपती उत्सवाकरिता आवश्यक कामे. RE19A161 | ०.२०५ | --- |
| ३) घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील विविध रॅम्प बंदिस्त करणे व कॉंक्रीट करणे. CE19A141 | ०.५० | --- |
| ४) प्लास्टिक व ईलेक्ट्रॉनिक वस्तू विभाजित करणेकरिता शेड बांधणे. CE19A153 | ०.२५ | --- |
| ५) घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे, कंटेनर मुक्त शहर करणे RE19A125 | ०.२५ | --- |
| ६) शहरातील विविध कचरा प्रकल्पावरून देवाची उरुळी येथे कचरा/रिजेक्ट वाहतूक करणे व शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणेसाठी मशिनरी पुरविणे व तदनुषंगिक कामे करणे. RE19A165 | ०.७५ | --- |
| ७) यांत्रिकी पद्धतीने रस्त्यांची सफाई करणे /इलेक्ट्रिक व्हॅक्युम रोड स्वीपिंग मशीन बी. ओ. टी./ भाडे तत्त्वावर घेणे (व्हे. डेपो) RE19A146 | १.२५ | --- |
| ८) कचरा वाहतुकीसाठी नव्याने उपनगरांमध्ये रॅम्पचेआधुनिकीकरण, विकास कामे करणे, यंत्रसामुग्री. CE19A156 | १.७५ | --- |
| ९) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित कामे करणे. CE19A158 | १.७५ | --- |
| १०) घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत विकेंद्रित पद्धतीने प्रभाग व वार्ड निहाय कचरा प्रक्रिया केंद्र उभारणे व तदनुषंगिक कामे करणे. CE19A163 | ०.९५ | --- |
| ११) जुने प्रकल्पाचे नुतनीकरण करणे. CE19A188 | ०.४५ | --- |
| १२) Pune Cantonment Board येथे दैनंदिन १०० मे. टन कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी प्रकल्प क्षमता वाढ, SLF व आधुनिकीकरण असा संयुक्त प्रकल्प. CE19A191 | ०.२० | --- |
| १३) मोबाईल टॉयलेट खरेदी करणे. CE19A193 | ० .१५ | --- |
| १४) घनकचरा व्यवस्थापन करणेसाठी प्राथमिक वाहतुकीसाठी गाड्या आउटसोर्सिंग तत्त्वावर (मनपा/ठेकेदाराकडील) चालविणे. RE19A149 | ६.१० | --- |
| १५) छोट्या घंटागाड्या देखभाल दुरुस्ती सह आउट सोर्सिंगवर चालविणे. RE19A174 | १.९० | --- |

| नवीन सुचविलेली कामे:-<br>घनकचरा व्यवस्थापन | | |
|---|---|---|
| १) EY Project Management Unit स्थापन करणे. RE19A158 | --- | १.०० |
| २) घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध RDF कचरा प्रक्रिया प्रकल्प देखभाल दुरुस्ती RE19A176 | --- | १.०० |
| ३) नोबल एक्सचेंज, कात्रज येथील १०० मे. टन क्षमतेच्या कचरा प्रकल्पासाठी टिपिंग फी अदा करणे.RE19A180 | --- | ३.०० |
| ४) गार्डन वेस्ट संकलन, वाहतूक व प्रक्रिया करणे या कामाची देयके अदा करणे, RE19A182 | --- | ८.५० |
| ५) उरुळी देवाची/फुरसुंगी येथे इनर्ट /रिजेक्ट मटेरीयलसाठी नव्याने शास्त्रोक्त भूभराव विकसित करणे व त्याची देखभाल दुरुस्ती करणे. CE19A157 | --- | ३.०० |

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७८१त्वर्य**

स्वारगेट क्र.१ अंतर्गत येणाऱ्या नव्याने समाविष्ट २३ गावांपैकी जांभूळवाडी व कोळेवाडी गावातील जलवाहिन्यांची दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. S A B ENTERPRISES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२५,४१,७४०/- पेक्षा १२.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२२,३६,७३१=२ अधिक जीएसटी र.रु.४,०२,६१२/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.२६,३९,३४३=२ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (१७-०७-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.१५,००,०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/७९९, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७८२त्वर्य**

स्वारगेट क्रमांक १ अंतर्गत येणाऱ्या आंबेगाव खुर्द गावठाण व इतर परिसरातील वितरण व्यवस्था नियंत्रित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. S A B ENTERPRISES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४९,९९,६३८/- पेक्षा ०.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४९,९९,६३८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.४९,९९,६३८/- तसेच (०७-०८-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.२५,००,०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/८००, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७८३त्वर्य**

पुणे महानगरपालिकेमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे राष्ट्रीय निवृत्ती योजना चालू करणेसाठी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुलेवि/८०१, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

१) महापालिकेमध्ये कार्यरत अधिकारी कर्मचारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी इत्यादीना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू करण्या अगोदर महापालिकांनी NPS ट्रस्ट यांच्या सोबत करारनामा करणे आवश्यक असून सदर प्रक्रियेमध्ये एकूण २ करारनामे पुणे मनपाकडून NPS व Central Recordkeeping Agency (Pro Team (NSDL) यांचे सोबत करारनामा करणेस,

२) करारनामा करताना सध्यस्थितीत NPS लागू करण्यासाठी आवश्यक असलेली कर्मचारी संख्या विचारात घेऊन प्रत्येक कर्मचारी अधिकारी यांचे PRAN (PERMANT RETIRMENT ACCOUNT NUMBER) काढणे व त्याबाबतची पुर्तता करणेस.

३) मे. शासनाने व PFRDA यांनी याबाबत भविष्य काळात NPS च्या रचनेत वेळोवेळी बदल केल्यास यांची अमलबजावणी करणेस.

४) NPS योजनेची मान्यता मिळाल्यानंतर DCPS मधीन CLOSING BALANCE NPS मध्ये OPENING BALANCE म्हणून ग्राह्य धरणेस.

५) सदर योजनेच्या अमलबजावणीसाठी आवश्यक असणारे करारनामे / फॉर्म इत्यादीवर मनपाच्या वतीने स्वाक्षरी करणेस अधिकारी / कर्मचारी तमेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी संदर्भक्र.२ अन्वये अनु.क्र.७ प्रमाणे.

   १. DIRECTOR OF TREASURIES & ACCOUNTS (मा. अति. महापालिका आयुक्त (ज) म्हणून स्वाक्षरी करणेस.)

२. DIRECTOR OF TREASURIES OFFICERS - (मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणून स्वाक्षरी करणेस.)
३. DRAWING & DISBURSING OFFICER- (संबंधित विभागातील प्रशासन अधिकारी/विभागप्रमुख /शिक्षणाधिकारी यांनी काम पाहाणेस.)

६) सदर योजनेच्या पुणे मनपा मध्ये (National Pension Scheme.) शासन निर्णय यातील अटी व शर्तीच्या अधिन राहून NPS सुरु करणेस.

७) सद्य स्थितीत आवश्यक असलेल्या कार्यवाहीबाबत मा. मुख्य मभा ठराव क्र.२२७ दि.०१/११/२०२२ मधील अनुक्रमांक ३,५ व ६ मुद्यामध्ये बदल करून खालील प्रमाणे फेर विचार करणेस.
१. मे. केंद्र शासनाने व राज्य शासनाने त्यांचेकडील अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा NPS संबंधित खाते उघडण्याचा खर्च केला आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा NPS चे खाते उघडणेचा खर्च पुणे महानगरपालिकेने करणेस,
२. CSC E-GOVERNANCE SERVICES INDIA LIMITED याची POP म्हणून नियुक्तीची आवश्यकता नसल्याने त्या ऐवजी CRA यांचेकडून कामकाज करणेस
३. NPS संपूर्ण योजना राज्य सरकारी अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या अनुषंगाने राबविण्याची असल्याने मे. राज्य शासनाच्या धर्तीवर पुणे महानगरपालिकेने स्वतंत्ररित्या फंड मॅनेजर नियुक्ती करण्याची आवश्यकता नसून मे. राज्य सरकारी कर्मचारी यांना लागू असलेल्या फंड मॅनेजर यांची नेमणूक करणेस.

८) मे. राज्य शासनाकडून वेळोवेळी NPS बाबत निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयानुसार पुणे महानगरपालिकेने अंमलबजावणी करणेस.

९) PRAN साठी लागणारा खर्च (सेवकांचा) खालील प्रमाणे मान्य करणेस.

| अ.क्र. | तपशिल | सेवक संख्या | दर | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | PRAN ऑनलाईन/ऑफलाईन (कमाल र.रु.४०) | ९५०७ | ४० | ३८०२८० |
| २ | PRAN देखभाल खर्च प्रत्येकी/प्रति PRAN | ९५०७ | ६९ | ६५५९८३ |
| ३ | PRAN आल्यानंतर प्रती PRAN स्टेटमेंट एकूण प्रती खर्च | ९५०७ | ४५ | ४२७८१५ |

मा. नगरसचिव– मा. आयुक्तसाहेब, आपल्या परवानगीने या विषयामध्ये मी काही बोलू शकते का?
मा. प्रशासक – हो, बोला.
मा. नगरसचिव– यामध्ये जे सीपीएसचे कर्मचारी आहेत ते सर्व एनपीएसमध्ये जाणार आहेत पण ज्यांचे ऑलरेडी एनपीएस खाते आहे त्यांचा जो PRAN नंबर आहे तोच नंबर पुढे कंटीन्यू होणार की नवीन खाते उघडायचे? आणि त्या खात्यामध्ये त्यांचा आधीचा जो बॅलन्स आहे तो देखील पुढे कंटीन्यू होणार का?
मा. कळसकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी – ज्यांचे खाते आहे त्यांचा तोच PRAN नंबर पुढे कंटीन्यू होणार आहे आणि त्यातील रक्कमही पुढे तशीच कंटीन्यू होणार आहे.
मा. नगरसचिव– त्याचबरोबर सीपीएसमध्ये जी रक्कम जमा झालेली आहे ती देखील पुढे कंटीन्यू होणार का? आणि सीपीएसमध्ये कर्मचाऱ्याच्या मूळ वेतन + महागाई भत्त्याचा मिळून १० टक्के हिस्सा आणि महानगरपालिकेचा मूळ वेतन + महागाई भत्त्याचा मिळून १४ टक्के हिस्सा असतो तो दोघांचाही हिस्सादेखील पुढे तसाच चालू राहणार आहे का?
मा. कळसकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी – हो, सीपीएसमध्ये जसे दोघांचेही जसे १० आणि १४ टक्के हिस्से होते ते तसेच पुढे कंटीन्यू राहणार आहे आणि सीपीएसची जी रक्कम जमा आहे ती देखील पुढे तशीच जमा होणार आहे.
मा. नगरसचिव– ठीक आहे.
मा. प्रशासक – ठीक आहे, दाखल करून मान्य करा.
**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७८४त्वर्य**

पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या ११ व २३ गावांपैकी भिलारेवाडी, गुजर-निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, कोळेवाडी, जांभूळवाडी गावांमध्ये तसेच समाविष्ट गावांमधील विहीर संपवेल व कार्यकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा विभाग क्र.१ यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या विविध भागात मागणीनुसार टँकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. GUJAR WATER SERVICES यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२,८६,१७,५४०/- पेक्षा १.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,८३,३१,३६४=६ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.२,८३,३१,३६४=६ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (११-०७-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.१,८९,००,०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/८०२, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.
मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.
**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७८५त्वर्य**

पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांपैकी वडाचीवाडी, पिसोळी व कार्यकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा विभाग क्र.१ यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या येवलेवाडी, कोंढवा व विविध भागात मागणीनुसार टँकरने पाणीपुरवठा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. SUDARSHAN WATER SUPPLIERS यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,२७,३२,८८८/- पेक्षा ०.६९०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२६,४५,०३१=०७ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.१,२६,४५,०३१=०७ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (११-०७-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.५०,००,०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/८०३, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७८६त्वर्य**

ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात विविध रस्त्यांवर पाणीपुरवठा वाहिनी/मलनिःसारण वाहिनी/गॅसवाहिनी/वीज वाहिनी तसेच केबल खोदाईचे रिईनस्टेटमेंट करणे तसेच इतर तदनुषंगिक कामे करणे (प्रभाग-२१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/s. B.N.CHAVAN यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.९९,७८,३३६/- पेक्षा ४४.९६% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५४,९२,०७६=१३ अधिक जीएसटी र.रु.९,८८,५७४/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.२,२४,८२७/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.६७,०५,४७७=१३ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (०२-०६-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/८०४, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७८७त्वर्य**

पुणे महानगरपालिका मान्य गणवेश नियमावलीनुसार वर्ग ३ व ४ चे अधिकारी/सेवकांना गणवेश व इतर साहित्यासाठी देय रक्कम रोख स्वरुपात बँक खात्यावर जमा करणेकामी गणवेश व इतर साहित्यासाठी सन २०२३-२४ मध्ये मान्य झालेल्या दरामध्ये १० टक्के नैसर्गिक वाढ गृहीत धरून सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या वर्षाकरीता देण्यात येणाऱ्या दरास महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी/प्र.क्र. १३३/का १४१७, दिनांक-५/१२/२०१६ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या श्री व पुरुष कर्मचाऱ्यांकरिता आवश्यक मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद साहित्यांची रक्कम निश्चित करून लाभार्थ्यांचे बैंक खाती जमा करणेकामी तसेच महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसीटी/प्र.क्र.१३३/का१४१७, दिनांक ५/१२/२०१६ मधील अ.क्र. २ नुमार विनिर्दीष्ट करणेत आलेल्या विहीत कार्यपध्दतीन्वये खर्च रक्कम सन २०२५-२०२६ मधील अंदाजपत्रकातील RE11K108 या अर्थशिर्षकावर रक्कम रुपये १५ कोटी इतकी तरतूद उपलब्ध असून सदरची उपलब्ध तरतुदी पर्यंतची रकम खर्ची टाकणेस तसेच मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमूद बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भांडार/८०५, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७८८त्वर्य**

प्रभाग क्र.१७ मध्ये दैनंदिन देखभाल दुरुस्ती कामे करणे करिता मजूर पुरविणे व इतर पाणीपुरवठा विषयक तदनुषंगिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Pravin Enterprises यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४९,९९,४२३/- पेक्षा २.१००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४८,९४,४३५=१२ अधिक जीएसटी र.रु.८,८०,९९८/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.५७,७५,४३३=१२ तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (१८-०७-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.३७,२०,०००) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/८०७, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७८९त्वर्य**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल खाजगी सहभागातुन विकसित करणे अंतर्गत महंमदवाडी व उंड्री शिवेवरील ऑर्चिड पॅलेस ते कडनगर चौक पर्यंत २७ मी. (१५ मी. डी.पी. व १२ मी.आर.पी. रस्ता) रुंदीचा डी.पी. रस्ता विकसित करण्यासाठी हाती घेणे आणि त्या अनुषंगाने प्री व पोस्ट टेंडर

ॲक्टिवीटीकरिता तज्ञ सल्लागार नेमणेसाठी मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/८०९, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७९०त्वर्य**

पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ प्रारूप प्रभाग रचना हरकती अनुषंगिक संगणकीय कामाची आत्यंतिक निकड, उपलब्ध असलेला अपुरा कालावधी व अपुरा सेवकवर्ग विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५ मधील कलम २ (२) मधील तरतुदीच्या अनुषंगाने प्रारूप रचनेवरील हरकती सूचनांविषयक कामकाजा करिता संगणकप्रणाली पुरविणे व आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ पुरविणे साठी मे.अल्टीमेट इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडून र.रु.९,००,०००/- (जीएसटी व्यतिरिक्त) पर्यंत करून घेण्यात आलेल्या कामास पश्चात मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नि/८१०, दि.१६/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७९१त्वर्य**

स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण उपक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राचे संयुक्त सहकार्याने राबविणेसाठी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/६७४, दि.३०/०९/२०२५ चे पत्रावर झालेला मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.०५, दि.१६/१०/२०२५ विचारासाठी.

१) स्पर्धा परीक्षा केंद्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे संदर्भ क्र.२ चे पत्राचे मागणीनुसार पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या गटातील व मागावर्गीय विद्यार्थ्यांकरिता तीन वर्षांकरिता मुदतवाढ होवून स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना M.P.S.C./U.P.S.C. राबविणेबाबत मान्यता मिळणेस,

२) पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र यांचे संयुक्त प्रकल्पान्वये मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत तसेच युवक कल्याणकारी योजने अंतर्गत M.P.SC. व U.P.S.C. स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना पूर्वीप्रमाणे राबविणेस व त्याप्रमाणे या विद्यापीठाबरोबर तीन वर्षांसाठी करारनामा करणेस व दरवर्षी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देणेस मान्यता तसेच प्रती प्रशिक्षणार्थी र.रु.३०,०००/- या प्रमाणे मागासवर्गीय गटातील १०० विद्यार्थ्यांचा प्रशिक्षण खर्च व खुल्या गटातील ५० विद्यार्थ्यांचा प्रती वर्षी प्रशिक्षण खर्च सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रास अदा करणेस,

३) पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आयोजित करणेकरीता जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रामार्फत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविणेस,

४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राचे ठिकाणी आयोजित करणेत येणाऱ्या प्रशिक्षण करीता विद्यार्थ्यांना जाणे येणे करीता बस पास प्रवास खर्चाची रक्कम पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत अदा करणेस. (या करीता विद्यार्थ्याने प्रथमतः बस पास स्वखर्चाने काढणे आहे. विद्यार्थ्यांस घर ते महाविद्यालय/सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र व परत घरी अशा प्रकारे बस पास प्रवास खर्चाची रक्कम अदा करणेत येईल.)

५) या योजने कारीताच्या परिशिष्ट "अ" मधील नमूद अटी व नियमास मान्यता मिळणेस,

६) मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता या उपक्रम अंतर्गत होणारा खर्च दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीमधून करणेस ४ अ मागासवर्गीय कल्याणकारी योजना निधी FE14B121 मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालविणे या अर्थशिर्षकावरील उपलब्ध तरतुदीमधून खर्ची करणेस, तसेच खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता या उपक्रम अंतर्गत होणारा खर्च ४ क युवक कल्याणकारी योजना निधी FE14D129 स्पर्धा परीक्षामार्गदर्शन केंद्र चालविणे या अर्थशिर्षकावरील उपलब्ध तरतुदीमधून खर्ची करणेस,

७) प्रती वर्षी या योजने करीता मनपा अंदाजपत्रकामध्ये स्वतंत्र आर्थिक तरतूद करणेस,

८) पुणे महानगरपालिका मार्फत सुरु करणेत येणाऱ्या या अभिनव शैक्षणिक साहाय्य योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करीता असताना वेळोवेळी आवश्यकते प्रमाणे योजनेच्या नियम अटी मध्ये तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास देण्यात येणाऱ्या प्रती विद्यार्थी प्रशिक्षण खर्चा पोटीच्या रक्कमेमध्ये त्या त्या परिस्थिती नुसार वाढ करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त किंवा ते प्राधिकृत करतील त्या अधिकाऱ्यास देणेस,

मा. प्रशासक – दाखल करून मान्य करा.

**निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.**

## कार्यपत्रिकेवरील विषय

**माहिती साठी आलेले विषय**

**विषय क्र.७४५**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१६/०८/२०२५ ते दि.३१/०८/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/७२५, दि.०८/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र. ७४६**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र.५, यांच्या अंतर्गत असणाऱ्या कामांच्या दि.१/०८/२०२५ ते दि.१५/०८/२०२५ अखेरची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(ड) नुसार मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र मआ/परि.क्र.५/७२६, दि.०८/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र. ७४७**

दिनांक ०८/०९ /२०२५ ते दिनांक १४ /०९ /२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालीकेच्या हद्दीत लागलेला एकूण २० आगीबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज ) यांचे जा.क्र मआ/ अग्निशमन /७२८ , दि.०९/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**विषय क्र .७४८**

दिनांक १५/०९ /२०२५ ते दिनांक २१ /०९ /२०२५ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे महानगरपालीकेच्या हद्दीत लागलेला एकूण १९ आगीबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज ) यांचे जा.क्र मआ/ अग्निशमन /७२९ , दि.०९/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – नोंद घ्या.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेतली.**

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र.७४९**

वडगांव बुद्रुक हायवे सर्व्हिस रस्ता रुंदीकरणामधील म.रा.वि.वि कंपनीचे एच.टी.फिडर व विद्युत केबल स्थलांतरणाची कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. MORESHWAR ELECTRICAL CORPORATION, यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५३,६२,३०३ /- पेक्षा२५.२५% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४०,०८,३२१=४९ अधिक जी.एस.टी र.रु. ७,२१,४९८/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु. ०/-पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अशी एकूण र.रु. ४७,२९,८१९=४९ ( अक्षरी र.रु. सत्तेचाळीस लाख एकोणतीस हजार आठशे एकोणीस रुपये एकोणपन्नास पैसे फक्त ) पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (०२-०९-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/७५९, दि.१३/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ७५०**

निरनिराळ्या ठिकाणी थर्मो प्लास्ट पेंटचे पट्टे मारणे (भाग २) कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या १३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Shree Swami Samarth Enterprises, यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५५,८६,४७२ /- पेक्षा ४२.२२०% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,२७,८६३=५२ अधिक जी.एस.टी र.रु. ५,८१,०१५/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु. ०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ७,९१०/- पर्यंत अशी एकूण र.रु. ३८,१६,७८८=५२( अक्षरी र.रु. अडोतीस लाख सोळा हजार सातशे आठ्या ऐंशी रुपये बावन्न पैसे फक्त ) पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (२६-०६-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/७६६, दि.१३/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ७५१**

गणेशखिंड रस्ता येथील नानावटी आश्रम ते रिजर्व बँक ऑफ इंडिया (RBI) दोन्ही बाजू रस्ता रुंदीकरणात खोदाई दरम्यान झालेल्या केबल दुरुस्त करणे व तदनुषंगिक विद्युत विषयक कामे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. M/S. BONDRE AND ASSOCIATES, यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७९,०२,९७४ /- अधिक जी एस टी पेक्षा ९.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र. रु. ७१,९१,७०६=३४ अधिक जी.एस.टी र.रु. १२,९४,५०७/- अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु. ०/- अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ० पर्यंत अशी एकूण र.रु. ८४,८६,२१३=३४( अक्षरी र.रु. चौर्यांशी लाख श्या ऐंशी हजार दोनशे तेरा रुपये चवतीस पैसे फक्त ) पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम **ब** पाकीट उघडलेचे दिनांक (२८-०८-२०२५) पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत /७६७, दि.१३/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७५२**

पुणे महानगरपालिकेचे ३२ दलली/दिन विठ्ठलवाडी मैलापाणी शुद्धीकरण केंद्र ०१ वर्ष चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Shree Vinay Eng Services Pvt, यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,५३,४६,९१९ /- अधिक जी एस टी पेक्षा २७.९०% ने कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रु १,१०,६५,१२८=६ अधिक जी.एस.टी. र.रु. १९,९१,७२३/- अधिक रॉयल्टीचार्जेस रुरु. ०/- अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ० पर्यंत अशी एकूण र.रु. १,३०,५६,८५१=६ ( अक्षरी र.रु. एक कोटी तीस लाख छप्पन हजार आठशे एक्कावन रुपये सहा पैसे फक्त ) अधिक विशेष भाववाढ सुत्रानुसार वेतनांमधील फरक अदा करणेस, काम करून घेणेस व सदरचे काम या दिनांका (०१-०७-२०२५) पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत /७६८, दि.१३/१०/२०२५ चे पत्र

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ७५३**

पुणे महानगरपालिकेच्या वसंतराव पाटील PET स्कॅन व MRI सेंटरकरिता नव्याने वीज जोडणी घेणेकामी विद्युत विषयक कामे करणे. कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. MORESHWAR ELECTRICAL CORPORATION, यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.७२,६०,४४८ /- अधिक जी एस टी पेक्षा ०९.९९% ने कमी ) असल्याने त्यांचेकडून र. रु. ६५,३५,१२९=२४ अधिक जी.एस.टी र.रु. ११,७६,३२३ /- अधिक रॉयल्टीचार्जेसे र.रु. ०/- अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ० /- पर्यंत अशी एकूण र.रु. ७७,११,४५२=२४ ( अक्षरी र.रु. सत्याात्तर लाख आकरा हजार चारशे बावन्न रुपये चोवीस पैसे फक्त )पर्यंत काम करून घेणेस व सदरचे काम वर्क ऑर्डर पासून सुरु करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/विद्युत /७६९, दि.१३/१०/२०२५ चे पत्र

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७५४**

खडकवासला जॅकवेल (पर्वती रॉ वॉटर) पंपिंग स्टेशन येथे पंपिंग यंत्रणाची २ वर्षे दैनंदिन ऑपरेटिंगचे कामे व देखभाल दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार में, Shree Samarth Electricals Engineers and Contractors, यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु. ३,३०,११,४७७ /- पेक्षा १२ % ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,९०,५०,०९९=७६ अधिक जी.एस.टी.र.रु. ५२,२९,०१८ /- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अशी एकूण र.रु. ३,४२,७९,११७=७६ ( अक्षरी र.रु. तीन कोटी बेचाळीस लाख एकोण ऐंशी हजार एकशे सतरा रुपये श्याहत्तर पैसे फक्त ) चे दिनांक. ०१/०९/२०२५ पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या लॉक केलेली र.रु. ५०,००,०००/-) पर्यंत काम करणेस व कंत्राटी कामगारांच्या किमान वेतन दरातील मे. शासनाकडून वेळोवेळी मान्य करण्यात येणाऱ्या कमी/अधिक दरवाढीनुसार होणाऱ्या उपलब्ध रकमेपर्यंत, काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु /७७०, दि.१४/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७५५**

वडगाव जलकेंद्र येथील जुने फिल्टर बेडचे रिग्रेडेशन व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Santaji R. Kadam, यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१२,४९,२७,५९३ /- पेक्षा ०.४७ % ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १२,४३,४०,४३३=३१ अधिक जी.एस.टी र.रु. २,२३,८१,२७८/-पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु. १२,४९,२७५=९३ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अशी एकूण र.रु. १४,७९,७०,९८७=३१ ( अक्षरी र.रु. चौदा कोटी एकोण ऐंशी लाख सत्त्तर हजार नऊशे सत्याऐंशी रुपये एकतीस पैसे फक्त ) तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम

सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र. रु. 60000000) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/७७१, दि.१४/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७५६**

कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणात्या प्रभाग क्र. १८ मध्ये दैनंदिन देखभाल दुरुस्ती कामे करणे करिता मजूर पुरविणे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Revan Siddheshwar Construction, यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५०,८४,४०८/- पेक्षा १.०००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५०,३३,५६३=९२ अधिक जी.एस .टी र.रु. ९,०६,०४२/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु. ०/-पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अशी एकूण र.रु. ५९,३९,६०५=९२ ( अक्षरी र.रु. एकोणसाठ लाख एकोणचाळीस हजार सहा शे पाच रुपये ब्याण्णव पैसे फक्त ) तसेच ब पाकीट उघडलेचे दिनांक (२१-०७-२०२५) पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र. रु. 1401001) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु /७७२, दि.१४/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७५७**

एसएनडीटी झोन अंतर्गत येणाऱ्या कोंढवे धावडे जॅकवेल येथील पंपाचे कोरोकोटिंग, रेट्रोफिटिंग व तदनुषंगिक कामे करणे. कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. Ranka Engineers, यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.३३,८८,८७६ /- पेक्षा ०.७० % ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,६५,१५३=८७ अधिक जी.एस.टी. र.रु. ६,०५,७२८/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु. ०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अशी एकूण र.रु. ३९,७०,८८१=८७ ( अक्षरी र.रु. एकोणचाळीस लाख सत्तर हजार आठशे एक्क्याऐंशी रुपये सत्याऐंशी पैसे फक्त ) तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र. रु. 3998874) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/७७३, दि.१४/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.७५८**

जुने लष्कर जलकेंद्र येथे एच.टी. विद्युत पुरवठ्यासाठी विविध सुधारणाविषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविले असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. MONARCH SALES CORPORATION, यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु.२७,१०,९४३/- पेक्षा ०.७२० % ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६,९१,४२४=२१ अधिक जी.एस.टी. र.रु. ४,८४,४५६/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु. ०/- पर्यंत अशी एकूण र.रु. ३१,७५,८८०=२१ ( अक्षरी र.रु.एकतीस लाख पंच्याहत्तर सत्तर हजार आठशे ऐंशी रुपये एकवीस पैसे फक्त ) तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम सुरु करणेस, दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र. रु. 1600000) पर्यंत तसेच काम करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/७७४, दि.१४/१०/२०२५ चे पत्र.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>संकीर्ण</u>**

**विषय क्र. ७५९**

पुणे, पेठ बालेवाडी स.नं. ३४ (भाग) व ३५ (भाग) येथील उद्यान (जी-१) आरक्षण क्षेत्रापैकी ताब्यात आलेले क्षेत्र वगळून उर्वरित सुमारे १९६३२.७५ चौ.मी. आरक्षित जागा भूसंपादन कायद्यानुसार ताब्यात घ्यावी लागणार आहे. तरी जागामालक देवी कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार श्री. विनोद बाणी यांनी पुणे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम १२७ अन्वये बजावलेल्या परचेस नोटीसचे अनुषंगाने पुणे, पेठ बालेवाडी स.नं. ३४ (भाग) व ३५ (भाग) येथील उद्यान (जी-१) आरक्षित सुमारे १९६३२.७५ चौ.मी. जागेकरीता भूसंपादनाची कार्यवाही सुरू करणेस स्थायी समिती मार्फत मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शअ/७५६, दि.१३/१०/२०२५ चे पत्र

मा. प्रशासक – हा विषय पुढील सभेला घ्या.

**निर्णय – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. ७६०**

सन २०२४ -२५ च्या आर्थिक हिशोबाच्या जमा खर्चास मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र मआ/मुलेवि/७५८ दि.१३/१०/२०२५ चे पत्र

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ७६१**

पुणे महानगरपलिकेच्या पर्वती जलकेंद्र व SNDT पंपिंग अखत्यारीतील पंपिंग स्टेशन तसेच लष्कर जलकेंद्र व होळकर जलकेंद्र व अखत्यारीतील पंपिंग स्टेशन्स या ठिकाणचे पुणे म.न.पा. सेवकांना कराव्या लागणाऱ्या जादा कामाचे वेतन आदा करणेकामी जादा कामाचे तासाचे मर्यादेबाबत व जादा कामाचे वेतनाचे सूत्रास खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/७६३, दि.१३/१०/२०२५ चे पत्र

१. पाणीपुरवठा विभागाचे पर्वती जलकेंद्र अखत्यारीतील पंपिंग तसेच एसएनडीटी पंपिंग, लष्कर जलकेंद्र व होळकर जलकेंद्र व अखत्यारीतील पंपिग या विभागातील १) इलेक्ट्रिशियन २) असि. इलेक्ट्रिशियन ३) पंप मेकैनिक ४) फिल्टर इन्स्पेक्टर ५) गाळणी परिचर ६) पंप चालक ७) फिटर ८) ऑईल मॅन ९) पाणीवाला व बिगारी या सेवकांना प्रती महिन्याचे होणारे जादा कामाचे तास ५० तासापर्यंत अनुज्ञेय करणे.

२. प्रत्येक सेवकाच्या जादा कामाची (ओव्हरटाईम) रक्कम ही खालील सूत्रानुसार कामाचे वेतन एकूण वेतनाचे 50% मर्यादित अदा करणे.

   तासाचा दर - (मूळ वेतन + महागाई भत्ता) /२६ येणारी रक्कम / ८ (विश्रांतीची वेळ वगळून) येणारी रक्कम X२

   अतिकालीन वेतन = तासाचा दर X कामाचे तास

३. पाणीपुरवठा विभागातील सेवकांचे जादा कामाचे माहे जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीतील वेतन उपरोक्त बाब क्रमांक १ व २ नुसार आदा करणेस.

मा. प्रशासक – मान्य करा.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. ७६२**

पुणे महानगरपालिका प्रशासनाकाडील गट-अ मधील संवर्गासाठी निवडश्रेणी वेतानस्तर मंजूर करण्याबाबतची कार्यपध्दती आणि पात्रतेच्या अटीबाबत मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या विषयपत्रात नमूद केलेल्या बाबीस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/आस्था ७६४, दि.१३/१०/२०२५ चे पत्र

मा. प्रशासक – या गट–अ मध्ये काय–काय आहे?

मा. काटकर, उपायुक्त – यामध्ये दोन पार्ट आहेत आणि त्यामध्ये १०४ केडरला आपल्याकडे स्टेनो आहेत.

मा. प्रशासक – दोन ग्रूप आहेत तर मग हे एकच का आणले आहे?

मा. काटकर, उपायुक्त – पहिला पार्ट म्हणजे यात १०४ केडर आहेत आणि त्यामध्ये १०४ वरची वेतनश्रेणी स्टेनोची केडर आहे.

मा. थोरात, उपायुक्त (सा.प्र.)– यात दोन भाग आहेत त्यामध्ये इंजिनिअर्स आणि स्टेनोचे केडर आहेत. हा विषय खरंतर सामान्य प्रशासन विभागाकडून यायला हवा होता तो फायनान्स डिपार्टमेंटकडून आला आहे. बक्षी समितीने सातव्या वेतन आयोगामध्ये काही केडरच्या वेतनश्रेण्यांमध्ये दुरूस्ती सूचविली आहे. त्यामध्ये काही महापालिकांनी यामध्ये दुरूस्ती केलेली आहे.

मा. प्रशासक – मग यामध्ये दुरूस्ती करून आणा.

मा. कळसकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी – मला यातील काहीच कल्पना नाही, ठीक आहे आपण एकत्रित बसून करू.

मा. प्रशासक – हा विषय पुढील सभेला घ्या.

मा. श्रीमती कळसकर – विषयपत्र मागे घेते.

मा. प्रशासक – नाही, पुढील सभेलाच घ्या.

**निर्णय – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा समाप्त झाली.

**सही /– XXX**
**(योगिता भोसले)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**.

**दि. ३१/१०/२०२५ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /– XXX**
**(नवल किशोर राम)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**